आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नाशिकमधे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासंदर्भात मुख्यमंत्र्यांची आढावा बैठक, तयारीसाठी ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्याची दिली माहिती, ३१ ऑक्टोबर २०२६ ला होणार सिंहस्थाला प्रारंभ

- शेती हा संस्कृती, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेचा आधार आहे या भावनेनं एकत्र काम केलं तर राज्याची शेती डिजिटल युगात जगाला दिशादर्शक ठरेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं मत

- मान्सूनचा प्रवास रखडल्यानं पेरणीची घाई न करण्याचा कृषी विभागाचा शेतकऱ्यांना सल्ला

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात दुसरा पात्रता सामना

**<><><><><>**

त्र्यंबकेश्वर आणि नाशिकमधल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजना संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नाशिक इथं १३ प्रमुख आखाड्यांचे महंत, साधुसंत, सर्व प्रमुख पुरोहीत संघाचे प्रतिनिधी यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. कुंभमेळ्याच्या आयोजनाच्या दृष्टीनं करायच्या कामांसाठी ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत, तसंच आणखी २ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढणार असल्याचं त्यांनी या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

कुंभमेळ्याच्या अनुषंगानं गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी तसंच नदी वाहती राहण्यासाठी विशेष कामं केली जाणार असल्याचं ते म्हणाले. या कुंभमेळ्याकरता साधु ग्रामसाठी जागा अधिग्रहीत करण्याचं काम या बैठकीत मार्गी लागलं. कुशावर्तावर होणाऱ्या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी उपाययोजनांवरही एकमत झाल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाचा कुंभमेळा दीर्घकाळ चालणार असून, एकाच तारखेला गर्दी, किंवा गर्दीमुळे कोणती दुर्घटना होणार नाही अशाप्रकारे नियोजन केलं जाईल, असं ते म्हणाले.

३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी सिंहस्थाला प्रारंभ होईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या कुंभमेळ्या दरम्यान नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी पहिलं अमृतस्नान २ ऑगस्ट २०२७ला आणि दुसरं अमृतस्नान ३१ ऑगस्ट २०२७ ला होणार आहे. नाशिकमधलं तिसरं स्नान ११ सप्टेंबर  २०२७ला होणार आहे, तर त्र्यंबकेश्वर मधलं तिसरं अमृत स्थान १२ सप्टेंबर २०२७ला होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><>**

शेती म्हणजे संस्कृती, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेचा आधार आहे या भावनेनं एकत्र काम केलं तर राज्याची शेती डिजिटल युगात जगाला दिशादर्शक ठरेल असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी  व्यक्त केला आहे. कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालयांसह आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्यानं देशात पहिल्यांदाच आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय कृषी हॅकेथॉनचं उदघाटन, अजित पवार यांच्या उपस्थितीत आज पुण्यात झालं, त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले....

**होल्ड - बाईट - अजित पवार**

या कार्यक्रमाला कृषिमंत्री माणिकराव कोकाटे उपस्थित होते.  शेतकऱ्यांचं उत्पादन वाढवण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्याच्या हेतूनं कृषीक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे,  असं ते म्हणाले.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नागालँड विधानसभेचे सर्व सातही आमदार सत्ताधारी पक्ष डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षामध्ये सामील झाले आहेत. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची संख्या ३२ झाली आहे. संसदीय कामकाज मंत्री आणि एनडीपीपी पक्षाचे वरिष्ठ नेते केजी केन्ये यांनी काल वार्ताहरांना ही माहिती दिली. या आमदारांनी विलीनीकरणाचा अर्ज विधानसभा अध्यक्षांकडे सादर केल्याचं केन्ये यांनी सांगितलं.

**<><><><>**

सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर, वन्यजीवांची तस्करी करत असलेल्या एका व्यक्तीला अटक केली. अधिकाऱ्यांनी त्याच्याकडून धोक्यात असलेल्या विविध प्रजातींचे ५२ जिवंत आणि १ मृत वन्यजीव जप्त केले आहेत. यात शिंगासारख्या शेपटाचे ३ विषारी जातीचे

जिवंत साप - स्पायडर टेल्ड हॉर्नड वायपर, ५ जिवंत पानसदृश्य आशियायी कासव, आणि ४४ जिवंत इंडिनेशियायी विषारी सापांचा समावेश आहे.
यासंदर्भातली खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर सापळा रचून संबंधित व्यक्तिची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडून तस्करीसाठी नेले जात असलेले वन्यजीव जप्त केले गेले. सीमाशुल्क विभागाने या व्यक्तीला अटक करून, त्याच्याविरोधात तपास सुरू केला आहे.

**<><><><>**

कोकणातल्या शेतकऱ्यांनी गटशेतीकडे वळायला हवं, असा सल्ला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. रत्नागिरी इथं ८० ग्रामपंचायतींना कचरा संकलनासाठी सीएनजी घंटागाड्यांचं वितरण शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. शेतकरी हा अन्नदाता आहे, त्यामुळे शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून काम झालं पाहिजे, कृषी विभागाकडून शेतकऱ्याला योग्य मार्गदर्शन व्हायला हवं असं शिंदे म्हणाले.

रत्नागिरी इथं नीलेश सांबरे यांच्या जिजाऊ शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेच्या भगवान महादेव सांबरे मोफत रुग्णालयाचं उद्घाटनही एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. तसंच माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयानं आयोजित केलेल्या पत्रकारांच्या कार्यशाळेला त्यांनी भेट दिली.

**<><><><>**

बदललेल्या वातावरणामुळं मान्सूनचा प्रवास सध्या रखडलेला असून, १० जूनपर्यंत राज्यात पावसाचं प्रमाण कमीच राहाणार आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी विभागानं विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांना दिला आहे. किमान १० जूनपर्यंत राज्यात बहुतांश भागात हवामान कोरडं राहणार आहे. यामुळे तापमानात वाढ होणार असून, विदर्भात तापमान ४० अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर पडण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज्स यांच्यात दुसरा पात्रता सामना होत आहे.

स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आजच्या सामन्यातला विजेता संघ आणि बंगळुरू यांच्यात येत्या ३ जूनला अहमदाबाद इथं अंतिम लढत होईल.

<><><><>

सुरक्षेसंदर्भातली नवनवीन आव्हानं आणि सज्जतेच्या दृष्टीनं मुंबईत कुलाबा इथल्या सैनिकी प्रशिक्षण केंद्रात एक उच्चस्तरीय संयुक्त आंतर सेवा सुरक्षा सराव आयोजित करण्यात आला होता. या दोन दिवसीय सरावात लष्कर, नौदल, हवाई दल, भारतीय तटरक्षक दल, फोर्स वन पथकाचे जवान आणि राज्य पोलीस दल सहभागी झाले होते. सुरक्षा दलांमध्ये योग्य समन्वय राखणं आणि सदैव दक्ष राहून विविध स्तरावरच्या संभाव्य धोक्यांना वेळीच प्रत्युत्तर देण्याचं प्रशिक्षण देणं, हा या सरावाचा उद्देश होता.

<><><><>

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं संरक्षण मंत्रालय आणि माय जी.ओ.व्ही. इंडिया या संकेतस्थळानं संयुक्तपणे देशभरातल्या युवा वर्गासाठी विविध स्पर्धांचं आयोजन केलं आहे. आजपासून या स्पर्धेला सुरुवात झाली.

याअंतर्गत ऑपरेशन सिंदूर - दहशतवादाविरोधातल्या भारताच्या धोरणाची नवी परिभाषा या विषयावरच्या निबंध स्पर्धंच आयोजन केलं आहे. या स्पर्धेतल्या पहिल्या तीन विजेत्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचं रोख पारितोषिक दिलं जाईल, तसंच त्यांना नवी दिल्ली इथं होणाऱ्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला उपस्थित राहण्याची संधी मिळणार आहे. माय जी.ओ.व्ही. या संकेतस्थळावर या स्पर्धेसाठी नोंदणी करता येईल.

या स्पर्धा सर्वांसाठी खुल्या असून, स्पर्धकांना येत्या ३० जुन पर्यंत स्पर्धांसाठी नोंदणी करता येणार आहे.

<><><><>

सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या माध्यमातून खऱ्या अर्थानं माणसं निर्माण केली जातात आणि समाज घडतो, असं प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी केलं. त्यांच्या हस्ते आज सांगलीत मिरज इथं दोन वसतिगृहांच्या इमारतींचं उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते.

“१२५ वसतिगृहांसाठी बाराशे कोटीं रुपयांची तरतूद केली असून, ही वसतिगृहं थ्री स्टार दर्जाची असतील,” असं त्यांनी सांगितलं. भाडेतत्त्वावरच्या इमारतीत सुरू असणारी वसतिगृहं भविष्यात शासकीय इमारतीत व्हावीत, यासाठी प्रयत्न राहील" असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातील जगप्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात रानटी हत्ती दाखल झाले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या रानटी हत्तीवर पाळत ठेवण्यासाठी वनविभागानं २५ वन कर्मचाऱ्याचं एक पथक तयार केलं असून. वनविभागानं या हत्तींवर ड्रोन कॅमेऱ्यानं निगराणी सुरू केली आहे. सध्या या भागात पर्यटनबंदी झाली नसली तरी सतर्कता म्हणून प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

<><><><>

विविध घोटाळ्यांमुळे वादग्रस्त ठरलेल्या अंबाजोगाई इथल्या स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेतला आणखी एक मोठा गैरव्यवहार उघडकीला आला आहे. या पतसंस्थेत सन २००० ते २०१२ या कालावधीत एकंदर २ कोटी २९ लाख ९३ हजार ७१७ रुपयांचा अपहार आणि गैरव्यवहार झाल्याचं विशेष लेखापरीक्षकांनी केलेल्या चाचणी लेखापरीक्षणातून स्पष्ट झालं आहे. या प्रकरणी एकूण १५ जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><>

भंडारा जिल्ह्यातल्या लाखनी वन परिक्षेत्रातील, बिट निलागोंदी इथं राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाअंतर्गत झाडं झुडपं साफसफाई करताना फॉलिडोटा वर्गातल्या एका मॅनिस प्रजातीतील दुर्मिळ सस्तन खवले मांजर हा वन्यप्राणी आढळून आला. वन्यजीवाची ओळख असणाऱ्या रामकृष्ण मेश्राम या मजुराला हा दुर्मिळ प्राणी आढळून आला. वन विभागाच्या बचाव पथकानं या खवल्या मांजराला बिळातून काढून ताब्यात घेतलं, आणि त्याची वैद्यकीय तपासणी करुन वनक्षेत्रात सोडून दिलं.

<><><><>

गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी-मोरगाव तालुक्यातल्या गोठणगाव इथल्या एका सहा वर्षीय मुलीवर बिबट्यानं हल्ला करत जखमी केलं. तिला उपचारासाठी अर्जुनी-मोरगाव इथल्या ग्रामीण रुग्णालयात हलवलं आहे. मुलगी सध्या सुखरूप असून तिच्यावर

उपचार सुरू आहेत. गोठणगाव इथली गेल्या पाच महिन्यातली बिबट्याच्या हल्ल्याची ही दुसरी घटना आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//